म. ग्रं. सं. ठाणें
काव्य
2530



# कागद आणि कॅनव्हास

REFBK-0024678
REFBK-0024678

अमृता प्रीतम

संदर्भ काव्य

२५३०

२४६५८

१२।६।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य 2530
ग्रंथ शाखा स्थळ



# कागद आणि कॅनव्हास

अमृता प्रीतम

REFBK-0024678
REFBK-0024678

पहिली आवृत्ती
जुलै १९८५
© १९८५, सुशील पगारिया

मुखपृष्ठ
इमरोज

प्रकाशक
सुशील पगारिया
क्रांति प्रकाशन,
मनवृंदावन
ओंकार नगर, जळगाव

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई
४०० ००४

वितरक
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई
४०० ००४

किंमत तीस रुपये

अमृताजी आणि इमरोजजी
आपलेच आपल्याला

—सुशील

१ उन्हाचा तुकडा
२ आठवण
३ मी
४ मेजवानी
५ आवाज
६ तू नाही आलास
७ बोलणं
८ थंडी
९ नागमणी
१० बंड
११ एक मुक्काम
१२ प्रकाश
१३ प्रसन्नता
१४ नववर्ष-शुभकामना
१५ डाग
१६ अन्नदाता
१७ आद्य रचना
१८ आद्य पुस्तक
१९ आद्य चित्र
२० आद्य संगीत
२१ आद्य धर्म
२२ आद्य कविता
२३ आद्य स्मृती
२४ मौनाचा कट
२५ हे माझ्या मित्रा ! अनोळख्या !
२६ अश्वमेध यज्ञ
२७ मी
२८ एक भेट
२९ माझा पत्ता

| | |
|---|---|
| एक भेट | ३० |
| एक घटना | ३२ |
| गल्लीतला कुत्रा | ३४ |
| वैराग्य | ३६ |
| प्रवासवर्णन | ३७ |
| ॲश ट्रे | ३८ |
| रचना-प्रक्रिया | ४० |
| टोस्ट | ४२ |
| कुमारी | ४४ |
| चिलखत | ४५ |
| स्टिल लाईफ | ४७ |
| काजानजाकिस | ४८ |
| ज्या जैने | ४९ |
| इमरोज चित्रकार | ५० |
| अमृता प्रीतम | ५१ |
| एक दृष्टिकोण | ५२ |
| आत्ममिलन | ५३ |
| दीड तासाची भेट | ५४ |
| आयुष्य | ५६ |
| पदके | ५७ |
| शहर | ५८ |
| एक पत्र | ५९ |
| अक्षर | ६१ |
| नागपंचमी | ६८ |
| मित्रा | ७० |
| मोकळी जागा | ७१ |
| आगीची कथा | ७२ |
| माता तृप्ताची नऊ स्वप्ने | ७३ |

# अनुवाद : एक अनुभव

एक हैरानी हुई और एक गहरी तसल्ली जब देखा कि सुशील पगारिया मेरी कविताओंको पंजाबीसे मराठी जबानमें ऐसे उडेंल रही है जैसे दो भाषाएं दो काँचके बर्तन हैं। और, काव्यकल्पना चिंतनके फलोंका ऐसा रस है, जो सहजतासे एक बर्तनमेंसे दुसरेमें डाला जा सकता है।

सुशील पगारिया खुद एक बडी अहसासमंद और गहरी संवेदनशीलताकी शायरा है। इसलिये मराठी भाषा तो उनके लिये एक पारदर्शी शीशा थी। पर पंजाबी भाषा भी उनको एक ऐसी पारदर्शी हो जायेगी यह मेरे लिये एक सुखद हैरानी की बात थी। जब वह मेरे सामने बैठकर कागज और कॅनव्हासकी हर कविता की हर पंक्तिका इतनी सहजतासे अनुवाद करती रही, तो मुझे लगा मेरे लिये भी मराठी भाषा इतनी अपनीसी हो गई है कि उसमें अपने चिंतनकी परछाइयाँ आसानीसे देख सकती हूँ।

**अमृता प्रीतम**

# अनुवादासंबंधी—

'कागद आणि कॅनव्हास' या अमृता प्रीतम यांच्या कवितासंग्रहात श्रीमती अमृताजींच्या संमतीने भारतीय ज्ञानपीठाने प्रकाशित केलेल्या त्यांच्या 'चुनी हुई कविता' या संग्रहामधून आणखी काही कवितांचा समावेश अनुवादासाठी केला आहे, आणि काही कविता गाळल्याही आहेत.

हा अनुवाद रसिकांच्या हाती देताना आनंद होतो आहे. तो अशासाठी की—

कलाकृतीची निर्मिती झाल्यानंतर ती फक्त कलावंताचीच राहत नाही. मालकी हक्क जरी मूळ कलावंताचा असला तरी ती कलाकृती रसिकापर्यंत पोचल्यानंतर आणि तिने रसिकाच्या मनाला स्पर्श केल्यानंतर त्या कलाकृतीबद्दलच्या ममत्वावर कोणाचे बंधन राहत नाही. ही कलाकृती कोणाची याचा विचार न करता ती भिडते तिथेच ममत्व निर्माण होते. आणि जे सुख, जो आनंद किंवा जे ममत्व आपल्यात उत्पन्न होते ते इतरांना दाखवून त्यांनाही त्यात सहभागी करून घेणे हा एक रसिकतेचा सहजस्वभाव आहे.

या अनुवादाचे तसेच काहीसे.

अनुवाद हा मूळ लेखकाच्या निर्मितीच्या वेळेच्या भावभावनांबरहुकूम करणे तसे नेहमीच कठीण; विशेषतः कवितेबद्दल तर आणखी कठीण! या पंजाबी कवितेच्या मूळ आशयसौंदर्याला बाध न आणता किंवा केवळ शाब्दिक न होता ती जास्तीत जास्त काळजीपूर्वक मराठीत आणण्याचा प्रयत्न मी केला आहे.

श्रीमती अमृताजींनी हा अनुवाद काळजीपूर्वक ऐकला, वाचला, काही शब्दांच्या सूक्ष्म छटांवर चर्चाही केली आणि मग तो छापण्यास संमती दिली. इतकेच नव्हे तर छोटी प्रस्तावनाही दिली. त्यांचे आभार कुठल्या शब्दांत मानू! पुस्तक त्यांचेच आहे. अनुवाद करताना मला त्यांच्या कवितेतून— शब्दाशब्दामधून विहरता आले याबद्दल मी त्यांची आणि कवितेची ऋणी आहे.

श्री० इमरोजजींनी मुखपृष्ठ तत्परतेने पाठवले. त्यांचीही मी आभारी आहे. हा अनुवाद केवळ शाब्दिक न होता, शब्दांप्रमाणेच आशयाचाही झाला पाहिजे असा कटाक्ष होता गुरुवर्य श्री० पु० भागवतांचा. श्री० भागवतजींनी जवळजवळ माझ्याइतकीच मेहनत या पुस्तकावर घेतली आहे. 'आभार' या औपचारिक शब्दाने त्यांच्या काव्यप्रेमाचा अवमान तर होणार नाही ना अशी भीती वाटते. मी त्यांची अंतःकरणपूर्वक कृतज्ञ आहे.

**सुशील पगारिया**

## उन्हाचा तुकडा

मला ती वेळ आठवते आहे—
जेव्हा उन्हाचा एक तुकडा सूर्याचे बोट पकडून
अंधाराची जत्रा पहात गर्दीत हरवला

विचार करते : भय आणि उदासीचे एक नाते असते
तशी मी याची कोणीच लागत नाही
पण या हरवल्या मुलाने माझा हात पकडला

तू कुठेच सापडत नाहीस
एक चिमुकला गरम श्वास हाताला स्पर्श करू पहातोय
ना हाताने रमतो, ना हाताला सोडतो

अंधाराला अंत नाही
जत्रेच्या कोलाहलातही एक शांततेचे जग आहे
आणि तुझी आठवण जणू या उन्हाच्या तुकड्यासारखी.

## आठवण

आज सूर्याने काहीसे घाबरून प्रकाशाची एक खिडकी उघडली
ढगाची एक खिडकी बंद केली आणि अंधाऱ्या जिन्यातून खाली आला

का कुणास ठाऊक पण आकाशाच्या भिवयीवर घाम आला
नक्षत्रांची बटनं खोलून त्याने चंद्राचा सदरा काढून टाकला

मी हृदयाच्या एका कोपऱ्यात बसले आहे तुझी आठवण अशी येते—
जसा ओल्या लाकडातून दाट कडवट धूर

त्याबरोबरच हजारो विचार आले कोरड्या लाकडासारखे,
भडक आगीचे निःश्वास भरलेले, दोन्ही लाकडे आत्ताच विझवली

कोळशासारखी वर्षे विस्कटली काही विझवली काही विझवायची राहिली
जेव्हा काळाचा हात आवरू लागला तेव्हा सांध्यासांध्यावर फोड आले

तुझ्या प्रीतीच्या हातून निसटले आणि आयुष्याचे भांडे फुटले
इतिहासाचा पाहुणा स्वयंपाकघरातून उपाशीच उठला

## मी

आकाश जेव्हा कधी रात्रीचे आणि प्रकाशाचे नाते जोडते
नक्षत्रे शुभकामना देतात
मी कां विचार करते : जर कुठे....मी, जी तुझी कोणी लागत नाही

ज्या रात्रीच्या ओठांनी कधी स्वप्नाचे भाल चुंबले
त्या रात्रीपासून कल्पनेच्या पायात जणू पैंजण रुमझुमते आहे

एक वीज जेव्हा आकाशात मेघाचे पान उलटते
माझी कहाणी भटकत असते—आरंभ धुंडत, अंत धुंडत

तुझ्या हृदयाची एक खिडकी जेव्हा कधी वाजते
विचार करते, माझ्या प्रश्नाची इथे किती हिंमत आहे!

तळहातावर प्रीतीच्या मेंदीचा काही अभिमान नाही
वियोगाचा एक रंग आहे आणि तुझ्या उल्लेखाचा सुगंध

मी, जी तुझी कोणी लागत नाही.....

## मेजवानी

रात्रबालेने मेजवानी दिली
नक्षत्रांचे तांदूळ फटकून कोणी तपेले चढवले

कोणी चंद्राची सुरई आणली
चांदण्याची मदिरा पिऊन आकाशाचे डोळे जडावले

धरतीचे हृदय धडकते आहे
ऐकलंय आज डहाळ्यांच्या घरी फुलं पाहुणी आहेत

पुढे काय लिहिले आहे
आता हे नशिबाला कोण विचारायला जाणार

माझ्या आयुष्याच्या कागदावर
तुझ्या प्रीतीने अंगठा उमटवला, हिशोब कोणी चुकता करायचा !

दैवाने एक गीत लिहिले आहे
म्हणतात, कोणी आज रात्री तेच गीत गाईल

कल्पवृक्षाच्या सावलीत बसून
कामधेनूच्या ओसंडल्या दुधाने आजवर कोणी घागर भरली आहे !

हवेचे निःश्वास ऐकणार कोण
चलावे, आज मला नशीब बोलवायला आले आहे....

## आवाज

वर्षांच्या वाटा कापीत तुझा स्वर आला आहे
सस्सीच्या पावलांना जणू कोणी मलम लावले

आज कोणाच्या डोक्यावरून जणू हुमणपक्षी उडत गेला
चंद्राने रात्रीच्या केसांत जणू फूल माळलं

निद्रेच्या ओठांना जणू स्वप्नाचा सुगंध येतो आहे
पहिले किरण जणू रात्रीच्या भांगेत सिंदूर भरीत आहेत

प्रत्येक अक्षराच्या देहातून तुझा सुवास येतो आहे
प्रीतीच्या पहिल्या गीताची पहिली ओळ गात राहिली

आंतरकामनेचे धागे जोडून आम्ही ओढणी विणीत राहिलो
विरहाच्या उचकीतही आम्ही सनई ऐकत राहिलो

'सस्सी' : पंजाबी लोककथांची नायिका. रेगीस्थानाच्या वाळवंटात आपल्या प्रियकरामागे धावता धावता तिच्या पायांना फोड आले होते.

## तू नाही आलास

चैत्राने कूस पालटली, रंगाच्या जत्रेसाठी
फुलांनी रेशीम गोळा केले—तू नाही आलास

दुपारी लांब झाल्या, द्राक्षांना लाली स्पर्शू लागली
कोयत्यांनी गव्हाच्या ओंब्या चुंबल्या—तू नाही आलास

मेघांनी अवकाश भरले, धरती दोन्ही हात पसरून
आकाशाची कृपा प्याली—तू नाही आलास

वृक्षांनी जादू केली, रानातून हवा आली
अन् ओठांत मधू भरला—तू नाही आलास

ऋतूने तोडगा केला, चंद्राने येऊन
रात्रीच्या भालावर झुंबर लावले—तू नाही आलास

आज नक्षत्रांनी पुन्हा सांगितले, आयुष्याच्या महालात अजूनही
लावण्याचे दीप तेवते आहेत—तू नाही आलास

किरणांचा गुच्छ सांगतो आहे, रात्रीच्या गाढ झोपेतून
प्रकाश अजूनही जागतो आहे—तू नाही आलास

## बोलणं

साजणा ये, आज बोलू या....

तुझ्या मनाच्या बागेत हिरव्या चहाच्या पानासारखे
जेव्हा केव्हा बोल उगवले, तू तिथेच बोल तोडलेस

प्रत्येक नाजूक गोष्ट लपवलीस, प्रत्येक पान सुकायला टाकलेस

मातीच्या या चुलीतून आपण एखादी ठिणगी शोधू या
एखाद-दुसरी फुंकर मारून विझते लाकूड पुन्हा फुलवू या

मातीच्या या चुलीतून प्रीतीची ऊब बोलू लागेल
माझ्या तनाच्या भांड्यात मनाचे पाणी उकळू लागेल

साजणा ये, आज पुरचुंडी खोल....

हिरव्या चहाच्या पानासारख्या
त्याच तोडून हरवल्या गोष्टी तेच सांभाळून सुकवले बोलणे
या पाण्यात टाकून बघ, याचा रंग बदलून बघ

एक गरम घोट तूही घे एक गरम घोट मीही घेते
आपण आयुष्याचा उन्हाळा घालवला, आयुष्याचा हिवाळा जाता जात नाही

साजणा ये, आज बोलू या....

## थंडी

माझे प्राण कापत आहेत, ओठ निळसर पडले आहेत
आत्म्याच्या पायाच्या बाजूकडून थरथर सुरू झाली आहे

या आयुष्याच्या आकाशात कित्येक वर्षांचे मेघ गर्जत आहेत
कायदे—जणू बर्फाचे गोळे, माझ्या अंगणात बरसत आहेत

चिखलाचे गळीबोळ ओलांडून—
जर तूं आलास, मी तुझे पाय धुवीन

सूर्यासारखी तुझी मूर्ती—
पांघरुणाचा काठ उचलून मी हातपाय शेकून घेईन

एक वाटी उन्हाची एका दमात पिऊन घेईन
अन् एक तुकडा उन्हाचा आपल्या कुक्षीत ठेवून घेईन

अन् कदाचित अशी जन्मोजन्मीची थंडी निवून जाईल.

## नागमणी

दाट गर्द बुद्धीचे जंगल
ज्ञानवृक्ष चंदनासारखे
मानससर्प कवड्या-कवड्यांचा
मस्तकावर एक चमकणारा मणी
आणि हवेत फणा विस्तारलेला

हलक्या पावलाने गारुडी आला
ओठावर पुंगी प्रीतीची
हातात आशेचा बंद पेटारा
निरसे दूध प्रेमाचे
मानससर्पाला पेटारा मिळाला

गारुडी एका चौकात बसला
पुंगी वाजवीत सापाला खेळवीत
सापाला कधी गळ्याशी लावीत
अनुराग हसतो विष रडते
खेळ बघायला सगळे लोक आले.

## बंड

आज आम्ही एक जग विकले
आणि एक धर्म खरीदला
आम्ही बंड केले

स्वप्नांचा तागा विणला होता
वारभर कापड फाडून घेतले
आणि आयुष्याची चोळी शिवली

आज आम्ही आकाशाच्या कुंभावरले
मेघांचे झाकण उघडले
आणि एक घोट चांदणं प्यालो

ही जी एक घटका आम्ही
मृत्यूकडून उसनी घेतली
गीतांनी याची किंमत देऊन टाकू.

## एक मुक़ाम

आज लेखणीने गीताचे यमक तोडले
माझे प्रेम या कुठल्या मुक्कामावर आले आहे

बघ दृष्टीवाना तुझ्या समोर बसले आहे
माझ्या हातातला वियोगाचा काटा काढून दे

आजवर जिने अंधाराशिवाय कधी काही विणले नाही
त्या प्रीतीने आज किरणे विणून दिली

ऊठ, तुझ्या घागरीतून एक पेला पाणी दे
या पाण्याने मी रस्त्यावरचे आघात धुऊन टाकीन

## प्रकाश

या वियोगाच्या रात्री थोडासा प्रकाश येतो आहे
कदाचित आठवणींचा दीप थोडा उंचावला असावा

एक आघात, एक जखम आणि एक कळ मनाजवळ होती
रात्रीच्या नक्षत्रांच्या रकमेने याचा गुणाकार केला

दृष्टीच्या आकाशातून सूर्य कुठे दूर निघून गेला
पण अजूनही चंद्राला त्याचा सुगंध येतो आहे

तुझ्या प्रीतीचा एक थेंब यात मिसळला होता
म्हणूनच मी आयुष्याचा सारा कडवटपणा पिऊन टाकला

## प्रसन्नता

दूर कुठून आवाज ऐकला—आवाज जणू तुझा होता
कानांनी दीर्घ श्वास घेतला, जीवनबाला थरकली

भोळी प्रसन्नता माझा हात सोडून चिमुकले दोन्ही बाहू पसरून
अनवाणी पायाने बालिकेसारखी दौडत गेली

पहिला काटा संस्काराचा, दुसरा काटा लोकलाजेचा
तिसरा काटा धनदौलतीचा, धोक्यासारखी कितीतरी कुसळे

तळव्यातून काटे काढीत बोटे दाबीत रक्त पुशीत
मैलोमैल लंगडत भोळी प्रसन्नता तिथे येऊन पोचली

पुढचा पाय पुढे पडे, मागचा पाय मागे वळे
आवाज जणू अगदी तुझा, नजर जणू अगदी परकी

संभ्रमाचा तीक्ष्ण काटा असा टाचेमधे शिरला
विद्या-बुद्धीची नखं बोथटली, कोणास ठाऊक काटा किती खोल गेला

सगळा पाय सुजून गेला आहे, जणू विष भिनते आहे
त्रस्तग्रस्त भोळी प्रसन्नता जमिनीवर बसून रडते आहे.

## नववर्ष-शुभकामना

जणू विचारांच्या कंगव्यातून एक दात तुटला
जणू जाणिवेच्या झग्याला एक धस लागला
जणू आस्थेच्या डोळ्यात एक कुसळ टोचले
झोपेने जणू आपल्या हातात स्वप्नाचा निखारा पकडला
नवे वर्ष काहीसे असे आले....

जणू मनाच्या ओळीतले एक अक्षर विझले
जणू विश्वासाच्या कागदावर शाई सांडली
जणू काळाच्या ओठांतून दीर्घ निःश्वास बाहेर पडला
आणि मानवजातीच्या डोळ्यात एक अश्रू तरारला
नवे वर्ष काहीसे असे आले....

जणू प्रीतीच्या जिभेवर एक फोड आला
सभ्यतेच्या मनगटातून एक कंगन फुटले
इतिहासाच्या अंगठीतून एक रत्न गळून पडले
धरतीने जणू आकाशाचे एक मोठे उदास पत्र वाचले
नवे वर्ष काहीसे असे आले....

## डाग

प्रीतीची कच्ची भिंत लिंपलेली, सारवलेली
तरीही रात्री हिच्यातून एक ढलपा निखळून पडला

जसे काही भगदाड पडले, भिंतीवरती डाग पडला

हा डाग आज रीं रीं करतो, हा डाग आज ओठ वाकडे करतो
हा डाग आज अढीवर चढला, हा डाग लाथा झाडतो

टकटक माझ्याकडे पहातो, जणू आपल्या आईचा चेहेरा ओळखतो
टकटक तुझ्याकडे पाहतो, आपल्या बापाची पाठ ओळखतो

टकटक जगाकडे पहातो, झोपण्यासाठी पाळणा मागतो
जगाच्या कायद्याशी खेळण्यासाठी खुळखुळा मागतो

आई काहीतरी मुखाने बोल या डागाला अंगाई ऐकवू
बापा काहीतरी मुखाने बोल या डागाला मांडीवर घेऊ

मनाच्या अंगणात रात्र झाली, या डागाला कसे झोपवू !
मनाच्या धाब्यावर सूर्य उगवला, या डागाला कुठे लपवू !

## अन्नदाता

अन्नदात्या ! माझ्या जिभेवर तुझे मीठ आहे
तुझे मीठ माझ्या बापाच्या ओठावर
अन् माझ्या या कुडीत माझ्या बापाचे रक्त

मी कशी बोलू ?
माझ्या बोलण्याच्या अगोदरच तुझे अन्न बोलते
काहीएक बोल होते, पण आम्ही अन्नाचे किडे !
आणि अन्नाच्या भाराखाली ते बोल दबून राहिले गेले

अन्नदात्या ! माझे मायबाप कामकरी, कामगाराची मुलं कामकरी
कामगारांचे काम फक्त काम
बाकीचेही काम तर ही चामडी करते आहे,
तेही एक काम हेही एक काम

अन्नदात्या ! मी मासाची बाहुली खेळून घे खेळवून घे
रक्ताचा पेला पिऊन घे पाजून घे
तुझ्यासमोर उभी आहे वापराची वस्तू, करून घे वापर

उगवले, दळले गेले, मळले गेले, लाटण्याने लाटली गेले
आज गरम तव्यावर पाहिजे तेव्हढी शेकून घे !
मी एका घासापलिकडे काहीच नाही, हवी तशी गिळून घे !
तू लाव्हारसापेक्षा अधिक काही नाहीस, हवे तसे वितळवून घे !
लाव्ह्यामध्ये लपेटून घे ! पायाशी उभी आहे बाहूमध्ये सामावून घे !

अन्नदात्या ! माझ्या जिभेवर अन् नकार ?
हे कसे होऊ शकेल ?
हां....प्रेम....तो तुझा प्रांत नाही.

## आद्य रचना

मी—एक निराकार माझ्यासारखी

हा 'मी'चा संकल्प होता, जो पाण्याचे रूप झाला
आणि 'तू'चा संकल्प होता, जो आगीसारखा प्रकट झाला
आणि आगीचे तेज पाण्यावर सरकू लागले
पण ती तर जुनी—इतिहासाच्या पूर्वीची गोष्ट आहे....

ही 'मी'च्या मातीची तहान होती
म्हणून तिने 'तू'चा समुद्र पिऊन टाकला
हे 'मी'च्या मातीचे हिरवे स्वप्न
म्हणून 'तू'चे जंगल तिने शोधून काढले
हा 'मी'च्या मातीचा सुगंध होता
आणि 'तू'च्या आकाशाची प्रीत होती
म्हणून 'तू'चे निळसर स्वप्न
मातीच्या शय्येवर झोपले.
हा तुझ्या आणि माझ्या मांसाचा सुगंध होता—
आणि हीच खरीखुरी आद्य रचना होती.

विश्वाची रचना तर खूपच नंतरची गोष्ट आहे....

## आद्य पुस्तक

मी होते—आणि कदाचित तूही

कदाचित एका श्वासाच्या अंतरावर उभा
कदाचित एका नजरेच्या आडोशाला बसलेला
कदाचित जाणिवेच्या एका वळणावर चालणारा
पण ती तर जुनी इतिहासाच्या पूर्वीची गोष्ट आहे....

हे माझे अन् तुझे अस्तित्व होते
जी जगाची आद्य भाषा झाली
'मी'च्या ओळखीची अक्षरे झाली
'तू'च्या ओळखीची अक्षरे झाली
आणि त्यांनी आद्य भाषेचे आद्य पुस्तक लिहिले.

हे माझे अन् तुझे मीलन होते
आपण दगडी शय्येवर झोपलो
आणि डोळे, ओठ, बोटे, पेरे
माझ्या अन् तुझ्या देहाची अक्षरे झाली
आणि त्यांनी त्या आद्य पुस्तकाचा अनुवाद केला.

ऋग्वेदाची रचना तर खूप नंतरची गोष्ट आहे....

## आद्य चित्र

मी होते—आणि कदाचित तूही....

मी सावलीच्या आत थिरकणारी छाया
आणि तूही कदाचित मातकट सावली
अंधाराच्या आत अंधाराचे तुकडे
पण ती तर जुनी—इतिहासापूर्वीची गोष्ट आहे....

रात्रींचा आणि झाडांचा अंधार होता
जे तुझं अन् माझं वस्त्र होतं
एक सूर्याचा किरण आला
तो दोघांच्या देहांतून पार झाला
आणि पलिकडच्या शिळेवर तो अंकित झाला
फक्त अवयवांची गोलाई होती, चांदण्याची टोके
हे विश्वाचे आद्य चित्र होते
पानांनी हिरवा रंग भरला
मेघांनी दुधाळ, आकाशाने आकाशी
आणि फुलांनी लाल, पिवळा, जांभळा

चित्रकला तर खूपच नंतरची गोष्ट आहे....

## आद्य संगीत

मी होते आणि कदाचित तूही....

एक अमर्याद शांतता होती
जी वाळल्या पानांसारखी गळत होती
किंवा उगीच किनाऱ्याच्या रेतीसारखी घसरत होती
पण ती तर जुनी इतिहासाच्या पूर्वीची गोष्ट आहे....

मी तुला एका वळणावर साद घातली
आणि जेव्हा तू वळून प्रतिसाद दिलास
तेव्हा हवेच्या गळ्यात काही थरथरले
मातीचे कण काहीसे सरसरले
आणि नदीचे पाणी काहीसे गुणगुणले
झाडांच्या डहाळ्या काहीशा ताणल्या गेल्या
पानांमधून एक झंकार उठला
फुलांच्या अंकुराने डोळे मिचकावले
आणि एका चिमणीचे पंख हलले
हा पहिला नाद होता जो कानांनी ऐकला होता

सप्तसुरांची नावे तर खूपच नंतरची गोष्ट....

## आद्य धर्म

मी जेव्हा तुला पेहरले
तेव्हा दोघांचे देह अंतर्लीन झाले
अंग फुलांसारखे गुंफले गेले
आणि आत्म्याच्या समाधीवर समर्पित झाले....

तू अन् मी हवनाचा अग्नी
तू अन् मी सुगंधित सामग्री
परस्परांची नावे ओठांतून निघाली
तीच नावे पूजेतले मंत्र झाले
हा तुझ्या माझ्या अस्तित्वाचा एक यज्ञ होता
धर्मकर्माची कथा तर खूपच नंतरची गोष्ट....

## आद्य कबिला

'मी'चा ऋतू जेव्हा बहरून आला होता
मांसाच्या रोपावर मोहोर आला होता
हवेच्या पदरात सुगंध बांधला
'तू'चे अक्षर लसलसून आले होते

'मी'च्या आणि 'तू'च्या सावलीत
'तो'जेव्हा निश्चिंत येऊन झोपला
हा 'तो'चा एक मोह होता
गव्हाचा दाणा आपण वाटून घेतला
'तो' सहज होता, स्वाभाविक होता, 'मी'ची आणि 'तू'ची तृप्ती

कबिल्यांची कथा तर खूपच नंतरची गोष्ट आहे....

## आद्य स्मृती

कायेच्या वास्तवापासून ते—
कायेच्या अभ्रूपर्यंत मी होते,
कायेच्या सौंदर्यापासून ते—
कायेच्या प्रीतीपर्यंत तू होतास.

ही 'मी' अक्षराची बुद्धी होती
ज्याने 'मी'ला सुसंस्कृत केले.
हा 'तू' अक्षराचा सोहळा होता
ज्याने 'तो'ला ओळखले,
भय-मुक्त 'मी'चे अस्तित्व आणि भय-मुक्त 'तू'चे, 'तो'चे

मनूची स्मृती तर खूपच नंतरची गोष्ट आहे....

## मौनाचा कट

रात्र पेंगते आहे....
कोणी माणसाच्या छातीला खिंडार पाडले आहे
कुठल्याही चोरीपेक्षा स्वप्नांची चोरी भयंकर आहे.

चोरीच्या खुणा—
प्रत्येक देशाच्या प्रत्येक शहराच्या प्रत्येक वाटेवर बसल्या आहेत
पण कुठलाही डोळा पहात नाही, की विस्फारीत नाही
फक्त एका कुत्र्यासारखी एका साखळीने बांधलेली
कधीतरी कोणाची एखादी कविता भुंकते आहे.

## हे माझ्या मित्रा ! माझ्या अनोळख्या !

एकदा अचानक—तू आलास
तेव्हा अगदी विस्मित झालेला काळ माझ्या खोलीत उभा राहिला.
संध्याकाळचा सूर्य मावळायला आला होता, पण मावळू शकला नाही
त्या वेळी मावळण्याचे भाग्य जणू तो विसरून गेला.
मग मूळच्या नियमांनी ठणकावून सांगितले,
आणि काळाने त्या उभ्या क्षणांना पाहिले
आणि घाबरून खिडकीवाटे तो बाहेर पळाला
ही गेल्या आणि थांबल्या क्षणांची कथा
आता तुलाही एक आश्चर्य वाटते आहे
मलाही मोठे आश्चर्य वाटते आहे
आणि कदाचित् काळालाही पुन्हा ती चूक करावीशी वाटत नसेल
आता सूर्य रोज वेळेवर मावळतो
आणि अंधार माझ्या काळजात उतरतो
परंतु गेल्या आणि थांबल्या क्षणांचे एक खरे आहे
जे तू आणि मी, मानावे वा न मानावे हे वेगळे
पण त्या दिवशी काळ जेव्हा खिडकीवाटे बाहेर पसार झाला होता
आणि त्या दिवशी त्याच्या गुडघ्यातून जे रक्त वाहिले
ते रक्त अजून माझ्या खिडकीखाली साचलेले आहे....

## अश्वमेध यज्ञ

एक चैत्री पौर्णिमा होती
अन् माझ्या प्रीतीचा दुधाळ शुभ्र घोडा
देशोदेशी भ्रमण करायला निघाला
सारे शरीर सत्यासारखे शुभ्र
आणि श्यामवर्ण विरही रंगाचे.
माथ्यावर एक सुवर्णपत्र
'हा दिग्विजयाचा घोडा—
कोणी बलवंत असेल त्याने याला पकडावे आणि जिंकावे.'
आणि या यज्ञाचा जणू एक नियम आहे
हा जिथे कुठे थांबला तिथे मी गीते दान केली
आणि कित्येक ठिकाणी हवन केले
म्हणून जो कोणी जिंकायला आला तो हरला.
आज वयाची सीमा संपलेली आहे
आणि हा सहीसलामत माझ्याकडे परतला आहे
पण हे कसले अघटित—
पुण्याची इच्छा नाही की फलाची लालसा शिल्लक नाही
माझ्या प्रीतीचा हा दुधाळ शुभ्र घोडा
मारला जात नाही—मारला जात नाही
बस्स, इथेच कुशल राहो, पूर्ण राहो !
माझा अश्वमेध अपुरा आहे, अपुराच राहो !

# मी

खूप समकालीन आहेत—
फक्त 'मी' माझा समकालीन नाही.
'मी'शिवाय माझा जन्म—
पुण्याच्या ताटात पडलेला अपराधाचा एक शकुन आहे
मांसात कैद झालेला मांसाचा एक क्षण आहे
आणि मांसाच्या प्रत्येक जिभेवर—
जेव्हा केव्हा एखादा शब्द येतो तो आत्महत्या करतो,
जो आत्महत्येतून वाचतो—
कागदावर उतरतो तो त्याचा खून होतो
बंदुकीची गोळी—
जी एकदा मला हनोईत लागते
दुसऱ्या वेळी प्रागमध्ये लागते
आणि एक धूर हवेत तरंगतो
आणि माझा 'मी' आठमासी अर्भकासारखा मरतो.
कधीतरी हा माझा 'मी' माझा समकालीन बनू शकेल का?

## एक भेट

कित्येक वर्षांनंतर अचानक एक भेट
आम्हा दोघांचे प्राण एखाद्या गीतासारखे थरारले

पुढ्यात एक पूर्ण रात्र होती—
पण अर्धे गीत एका कोपऱ्यात संकोचून बसले
अन् अर्धे गीत दुसऱ्या कोपऱ्यात बसून राहिले

मग पहाटे पहाटे—
आम्ही फाटक्या कागदाच्या तुकड्यांसारखे भेटलो
मी माझ्या हातात त्याचा हात घेतला
त्याने आपल्या बाहूवर माझा बाहू घेतला

आणि आम्ही दोघे एका सेन्सॉरसारखे हसलो
आणि कागद एका थंड टेबलावर ठेवून
त्या सबंध गीतावर एक फराटा ओढला

## माझा पत्ता

आज मी माझ्या घराचा नंबर पुसला आहे
आणि गल्लीच्या तोंडावर लावलेला गल्लीच्या नावाचा फलक काढून टाकला आहे
आणि प्रत्येक रस्त्याच्या दिशेचे नाव पुसले आहे
पण जर मी तुम्हांला हवीच असेन
तर प्रत्येक देशाच्या, प्रत्येक शहराच्या, प्रत्येक गल्लीचा दरवाजा ठोठवा
हा एक शाप आहे, एक वरही आहे
जिथे कुठे स्वतंत्र आत्म्याची झलक दिसेल
—समजा की ते माझेच घर आहे.

## एक भेट

मी गप्प, शांत आणि निश्चल उभी होते
फक्त शेजारी समुद्रात वादळ होते....
मग समुद्राला काय वाटले देव जाणे
त्याने वादळाची एक मुटकुळी बांधली
माझ्या हातावर ठेवली आणि हसून तो थोडा दूर गेला

विस्मित झाले होते पण मी त्याचा चमत्कार पकडून घेतला
माहीत होते की अशी घटना शतकांतून कधीतरी घडते....

लाखो विचार आले
मस्तकात झगमगले

पण उभीच राहिले की हिला घेऊन
आता माझ्या शहरात मी कशी जाऊ ?
माझ्या शहरातली प्रत्येक गल्ली चिंचोळी आहे
माझ्या शहरातले प्रत्येक छप्पर बुटके आहे
माझ्या शहरातली प्रत्येक भिंत चहाडखोर आहे

वाटले तू कुठे भेटलास तर
समुद्रासारखे हिला छातीवर ठेवून
आपण दोन्ही किनाऱ्यांसारखे हसू शकलो असतो

आणि बुटक्या छपरांच्या—
चिंचोळ्या गल्ल्यांच्या शहरांत वसू शकलो असतो....

पण सगळी दुपार तुला शोधण्यात गेली
आणि आपल्या आगीचा मी स्वतःच घोट घेतला

मी एक एकटा किनारा, मी किनाऱ्याला ढासळवून घेतले
आणि जेव्हा दिवस ढळायला आला—
तेव्हा समुद्राचे वादळ समुद्राला परत केले
आता रात्र घेऊन आली तेव्हा तू भेटलास
तूही उदास, गप्प, शांत आणि निश्चल
मीही उदास, गप्प, शांत आणि निश्चल
फक्त दूरच्या समुद्रात वादळ आहे....

## एक घटना

तुझ्या आठवणी
खूप दिवस झाले निर्वासित झालेल्या
जिवंत आहेत की मेल्या....काही ठाऊक नाही.

फक्त एकदा एक घटना घडली
आठवणींची रात्र फार गडद होती
आणि इतकी स्तब्ध होती
की पानही हलले
तरी वर्षांचे कान चमकारावेत

मग तीन वेळा जाणवले
जणू कोणी हृदयाचे द्वार खडखडवतो आहे
हलक्या पावलाने कोणी छतावर चढतो आहे
आणि नखांनी मागची भिंत खरवडतो आहे

तिन्ही वेळा उठून मी कडी चाचपली
अंधाराला जणू एक गर्भकळ येत होती
तो कधी काही म्हणायचा तर कधी गप्प व्हायचा
जणू आपल्या आवाजाला दातांखाली दाबायचा
मग एक जिती-जागती वस्तू
आणि जिता-जागता आवाज !

"मी खूप दूरवरून आले आहे
पहारेकऱ्यांच्या नजरेपासून या देहाला चोरून
हळूच आले
मला ठाऊक आहे की तुझे हृदय पूर्ण वसलेले आहे
पण एखादी सुनी वैराण जागा माझ्यासाठी?"

"वैराण सुने खूप आहे पण तू"
चमकून मी विचारले—
"तू निर्वासित....नाही कुठलीही जागा नाही
मी खरेच सांगते की कुठलीही जागा नाही तुझ्यासाठी
ही माझ्या मस्तकाची माझ्या मेंदूची आज्ञा आहे!"

आणि मग जणू सारा अंधार थरारला
ती मागे वळली
पण जायच्या आधी थोडी जवळ आली
आणि माझ्या अस्तित्वाला एकदा स्पर्श केला
हलक्याने
जसा कोणी आपल्या मायभूमीच्या मातीला स्पर्श करावा....

## गल्लीतला कुत्रा

कैक वर्षांची गोष्ट आहे—
जेव्हा तू आणि मी विलग झालो
काही पश्चाताप नाही
फक्त एक गोष्ट काही लक्षात येत नाही

तू आणि मी जेव्हा निरोप घेत होतो
आणि आपले घर विकले जात होते
स्वयंपाकाची रिती भांडी अंगणात पडली होती
कदाचित माझ्या किंवा तुझ्या डोळ्यांत बघत असावीत
काही उपडीही पडली होती—
कदाचित तोंड लपवीत असावीत.

दारावरची एक वेल कोमेजलेलीशी
कदाचित तुला आणि मला काही सांगू पहात होती
—किंवा पाण्याच्या नळाला टोमणा देऊ पहात होती

हे सगळे काही आणि अशासारखे
कधी आठवत नाही
फक्त एकच गोष्ट खूपशी आठवते—

की सडकेवरचा एक कुत्रा
कसा आणि काय हुंगत
एका रिकाम्या खोलीत शिरला
आणि खोलीचे दार बाहेरून बंद झाले

मग तिसऱ्या दिवशी—
घराचा सौदा जेव्हा आटोपला

आणि आपण किल्ल्या देऊन नोटा घेतल्या
नव्या मालकाकडे जेव्हा प्रत्येक कुलूप सोपवले
आणि एकेक खोली दाखवली
तेव्हा एका खोलीत त्या कुत्र्याचे प्रेत होते
मी त्याचे भुंकणे कधी कानाने ऐकले नव्हते
—फक्त त्याचा वास हुंगला होता
आणि अजूनही मला अचानक—
तोच वास कित्येक वस्तूंना येतो....

# वैराग्य

चिरकाल हे चालत आले होते
काळाची शक्ती लाच देऊन
इतिहासाला चोरून इतिहासाची पाने खरेदी करीत होती
तिला जेव्हा वाटले तेव्हा
ती काही ओळी बदलीत राहिली आणि काही पुशीत राहिली
इतिहास हसत राहिला चिडत राहिला
आणि प्रत्येक इतिहासकाराला तो क्षमा करीत राहिला
पण आज कदाचित तो फार उदास आहे—
एक हात ग्रंथ उचलून
काही पाने फाडतो आहे
आणि त्याच्या जागी काही पाने शिवतो आहे
आणि इतिहास—हळूच त्या पानांतून निघून
एका झाडाखाली उभा राहून एक सिगरेट पितो आहे.

## प्रवासवर्णन

गंगाजलापासून वोदकापर्यंत
हे प्रवासवर्णन आहे माझ्या तहानेचे
साध्या पवित्र जन्माचा, साध्या अपवित्र कर्माचा, एक साधा उपाय
एका हिंदकळत्या पेल्यात कुठलासा एक प्रिय चेहरा पहाण्याचा यत्न
आणि आपल्या देहाला अगदी परक्या असलेल्या एका जखमेला विसरण्याची गरज

हे किती त्रिकोणी दगड आहेत—
जे कुठल्या पाण्याच्या घोटाबरोबर गळ्याखाली उतरले आहेत
कितीतरी भविष्यं आहेत—जी वर्तमानापासून वाचवली आहेत
आणि कदाचित वर्तमानही मी वर्तमानापासून वाचवला आहे....

फक्त एक विचार येतो
कित्येक वेळा येतो—
जसा कित्येकदा एक सारंगीचा गज
अचानक एखाद्या रागाच्या छातीत खुपतो
किंवा गुपचूप एक पियानो
काळ्या अन् पांढऱ्या दातांनी संगीत चावतो

एक विचार येतो—
पण जसा कोणी मृत्यूचा एक घोट घ्यावा
भ्यावे आणि लगेच तो विचार ओकून टाकावा
परंतु मृत काळजातही काही श्वास जिवंत असतात
त्या अडकलेल्या श्वासांबरोबर मी सांगू शकते की....
—जिथे ही प्रवासवर्णनं संपतात
फक्त तेथूनच प्रत्येक यात्रा सुरू होते.

## ॲश ट्रे

दैवी वाणीच्या धुरापासून ते सिगरेटच्या राखेपर्यंत
वयाचा सूर्य ढळतो आहे
डोक्यातले विचार जळत आहेत
एक फुफ्फुस गळते आहे
एक व्हियतनाम जळते आहे

आणि प्रकाश—अंधाराचे शरीर जसे ज्वराने तापावे
आणि तापाच्या गुंगीत—
प्रत्येक धर्म बरळत आहे
प्रत्येक तत्त्वज्ञान लंगडे पडते आहे
प्रत्येक गीत अडखळते आहे
आणि ते सांगू पहाते
की प्रत्येक शासन टक्क्याचे असते, दारुगोळ्याचे असते
आणि प्रत्येक जन्मपत्रिका—
आदमच्या जीवनाची एक खोटी साक्ष देते आहे.

पायांत शृंखला पडत आहेत
कानांत दडे बसत आहेत
विचारांचा हिशोब थांबून
टक्क्यांचा हिशोब चालतो आहे
आणि मी मानव शेवटी मांसाचा बनलेला एक ट्रे
दैवी वाणीच्या धुरापासून सिगारेटच्या राखेपर्यंत
मी ज्या काळज्या प्याले
त्यांची राख झटकली होती
तूही झटकू शकतोस

आणि हवे तर मांसाचा हा ॲश ट्रे मेजावर सजव
किंवा गांधी, ल्यूथर आणि केनडी म्हणून
पाहिजे तर फोडू शकतोस

## रचना-प्रक्रिया

कधी कवितेने कागदाकडे बघावे आणि असे तोंड फिरवावे
जणू कागद परपुरुषच आहे....

परंतु कधी एखाद्या कुमारिकेने करवाचवथीचे व्रत करावे
आणि त्या रात्री तिला जसे स्वप्न पडावे
अचानक एक पुरुषस्पर्श होतो आहे
आणि स्वप्नात तिचे शरीर शहारते आहे

पण कधी त्या अंगारचवीने भयचकित होते
जागी होते
मुसमुसलेल्या अवयवांना चाचपीत
चोळीचे बंद सोडीत
चांदण्याची ओंजळ देहावर टाकते
अन् देहाला सुखवणारीचा हात स्फुंदायला लागतो

देहाचा अंधार चटईसारखा अंथरलेला
ती चटईवर पालथी पडते
तिच्या काड्या तोडते
आणि तिचे अंग अंग पेटून उठते
आणि तिला जाणवते की तिचा देहाचा अंधार
कोणा सशक्त बाहूंत चूर होऊ इच्छित आहे

अचानक एक कागद पुढे सरकतो
आणि तिच्या कापऱ्या हातांना स्पर्श करतो
एक अंग जळते आहे
एक अंग विरघळते आहे
आणि ती एक अनोळखी गंध हुंगते
आणि तिचा हात देहावर उमटलेल्या रेषा बघतो आहे....

हात पेंगतो, देह तडफडतो
आणि माथा घामेजून जातो
एक दीर्घ रेषा तुटते
आणि श्वास—
जन्म आणि मृत्यूच्या दुहेरी गंधात चिंब होतात....

ह्या सगळ्या काळ्या आणि बारीक रेषा
जणू एका दीर्घ किंकाळीचे काही तुकडे होतात....
ती गप्प आणि त्रस्त जणू पिळवटलेली उभी बघते आहे
विचार करते आहे—
काहीतरी अन्याय झाला आहे
तिचा कुठलातरी अवयव मृत झाला आहे
कदाचित एखाद्या कुमारिकेचा गर्भपात असाच होतो....

## टोस्ट

काल काचेच्या सुरईत
मी कल्पनांची मदिरा भरली होती
कल्पना मोठ्या लालजर्द होत्या
मित्रांनी प्याले रिचवले होते
आणि अशा शब्दांचे टोस्ट दिले होते
जे हृदयात उगवत नसतात.
ते कोणत्या झाडावर उगवतात
आणि ओठांच्या कुंडीत कसे येतात
हा विचार करायला वेळ नव्हता,
किंवा असे म्हणू की विचार करायला भीती वाटत होती
हा शब्दांचा सोहळा होता
भुरळींचा वाढदिवस
मी होते, रात्र होती, कल्पनांची मदिरा होती, आणि पुष्कळ मित्र
दोस्त काही बोलावण्यावरून आले होते, काही न बोलावता
फक्त कोणीसा एक 'तो' होता
ज्याला अनेकदा बोलावूनही आलेला नव्हता

आता सकाळ झाली आहे—
छाती भेदून छातीत सूर्याची किरणे पडली आहेत
आता—मी एक दाट जंगल पाहिले आहे
स्वार्थाचे वृक्ष पाहिले आहेत
आणि वृक्षावर आलेली आगळी पानगळही पाहिली आहे
पानगळ—जी शब्दांवर येत नाही
फक्त आशयांवर येते
मित्रांचे शब्द अजूनही गुलाबी आहेत

मोसमी फुलांसारखे
फक्त आशय गळताना पहाते आहे
आणि भरल्या जंगलात मी फक्त एकटी आहे
मी आहे, मौन आहे, एक किरण आहे आणि काचेची रिकामी सुरई आहे

हे कसले मौन आहे की ज्यात पायांची चाहूल आहे
कोणी गुपचूप आले आहे—
मौनातून तुटलेला मौनाचा तुकडा
किरणातून तुटलेला किरणाचा तुकडा

हा एक कोणी 'तो' आहे
जो अनेकदा बोलावूनही आलेला नव्हता.
आणि आता मी एकटी नाही, मी माझ्या बरोबर उभी आहे
काचेच्या सुरईत नजरांची मदिरा भरली आहे—
आणि आम्ही दोघे प्याले पीत आहोत
तो टोस्ट देतो आहे अशा शब्दांचे
जे फक्त हृदयात उगवतात
हा आशयांचा सोहळा आहे—
मी आहे, तो आहे, आणि काचेच्या सुरईत नजरांची मदिरा आहे....

## कुमारी

मी जेव्हा तुझ्या शय्येवर पाऊल ठेवले होते
मी एकटी नव्हते—दोन होते
एक पूर्ण विवाहित एक पूर्ण कुमारी....
तुझ्या भोगासाठी—
मला त्या कुमारीची हत्या करायची होती
मी हत्या केली होती—
ही हत्या जी कायद्याने न्याय्य असते
फक्त तिचा अपमान अन्याय्य असतो
आणि मी त्या अपमानाचे विष प्याले होते
मग सकाळच्या वेळी—
रक्ताने माखलेले आपले हात पाहिले होते
हात धुतले होते—
अगदी तसे जसे दुसरे मळलेले अंग धुवायचे होते
पण जशी मी आरशासमोर आले तो
ती समोर उभी होती
तीच, जिला मी माझ्याकडून रात्री मारले होते
अरे देवा!
शेजेवरचा काळोख इतका गर्द होता?
मला मारायचे कोणाला होते अन् मी मारून कोणाला बसले....

## चिलखत

मी मैत्रीचे चिलखत घातले आहे
आणि आता उघड्या अंगाला काही स्पर्शत नाही
ना शत्रूचा हात स्पर्श करतो
ना माझ्या मित्रांचे बाहू शिवतात

मी मैत्रीचे चिलखत घातले आहे
मी प्रसन्न आहे, फक्त हे का विचारता मला
की काही सुखे एवढी उदास का असतात?
आता काही उडत्या चिमण्या
माझ्या डोक्यावर बसल्या होत्या
कदाचित चिलखताला
एका झाडाचे हिरवेपण समजून
पण लोखंडी पानांवर चोच मारून
त्या आत्ता कळवळल्या होत्या
आणि माझ्या डोक्यावरून उडून गेल्या.
वेड्या चिमण्या—
चिलखतही कधी चिमण्यांना भ्याले आहे?
पण एखादी चोच मांसाला मारली असावी
माझ्या मस्तकाचे मांस दुखल्यासारखे वाटते आहे
काळाने गळ्यातून प्रत्येक वस्त्र काढून टाकले आहे
फक्त तीनच जोड होते—
एक भूताचा, एक वर्तमानाचा आणि एक भविष्याचा
आणि कदाचित ते तिन्ही जोड खूप मळलेले होते
आणि विवस्त्र काळ एका कोपऱ्यात उभा आहे
जरा लाजल्यासारखा वाटतो आहे

किंवा त्याच्या उघड्या पाठीवर जे काही स्फुंदत आहे
ते माझ्या डोळ्याचे प्रतिबिंब आहे?
की तो आपले नव्हे माझे नागवेपण प्याला आहे?
पण मी—मी तर या वेळी नग्न नाही
मी मैत्रीचे चिलखत घातले आहे—

## स्टिल लाईफ

हा जालियनवाला—
आणि त्याच्या भिंतींत गुपचूप बसलेली गोळयांची छिद्रे
हा सायबेरिया—
आणि त्याच्या जमिनीवर किंकाळ्याचे तुकडे बर्फात गोठलेले
कॉन्सेन्ट्रेशन कँप—
माणसाच्या मांसाचा गंध भट्टीच्या राखेत झोपलेला
हे करागुयेवाच—
ज्याची एकूण वस्ती एका दगडी मूर्तीत चिणलेली
हा हिरोशिमा आहे—
जो एका कोपऱ्यात एका फाटलेल्या दस्तऐवजासारखा पडलेला आहे
आणि हा प्राग—
जो आज श्वास रोखून सेन्सॉरच्या मुठीत बसला आहे
प्रत्येक वस्तू मूक आणि स्तब्ध आहे
फक्त माझ्या छातीतून एक दाटलेला श्वास निघतो आहे
आणि धरतीचा प्रत्येक तुकडा हेलावून जातो आहे.

टीप : करागुयेवाच : युगोस्लाव्हियाचे एक शहर जे जर्मनीच्या हातून एका दिवशी जळून राख झाले होते.

## काजानजाकिस

मी जीवनावर प्रेम केले होते
पण जीवन एखाद्या वेश्येसारखे
माझ्या प्रेमाला हसत राहिले
आणि मी उदास एक निराश प्रेमिक
चिंतेने झुरत राहिलो....
पण जेव्हा त्या वेश्येचे हसणे
मी कागदावर चितारले
तेव्हा प्रत्येक अक्षराच्या कंठातून एक किंकाळी फुटली
आणि परमेश्वराचे आसन कितीतरी वेळ डळमळत राहिले.

टीप : काजानजाकिस : युनानी फिलॉसॉफर

## ज्या जैने

एका दरीसारखी कुक्षी होती
लोक म्हणाले दरीबाहेर येणे
बेकायदेशीर आहे
म्हणून त्याच्या कायद्याचे पालन करा
मला पुन्हा दरीत पडायचे होते
खूप शोधले—
पण पहिली दरी
कुठेच सापडली नाही
म्हणून जी मिळाली
त्यात उडी मारली
पण तरीही हे पोलीस
माझ्या मागे का लागले आहेत ?

टीप : ज्या जैने हा प्रथम अनौरस संतान होता. मग एक चोर म्हणून फ्रान्सच्या तुरुंगात गेला. तिथे तो फिलॉसाफर झाला आणि त्याने खूप लेखन केले. सार्त्रने त्याला संत म्हटले आहे.

## इमरोज चित्रकार

माझ्या समोर—घोडीवर एक कॅन्व्हास पडले आहे
असे काहीसे वाटते
कॅन्व्हासवर लावलेला रंगाचा तुकडा
एक लाल कापड होऊन हलतो आहे
आणि प्रत्येक माणसातील पशू
एक शिंग उचलतो आहे
शिंग रोखतो आहे—
आणि प्रत्येक रस्ता, गल्ली, बाजार एक 'रिंग' होतो
माझ्या पंजाबी रक्तात एक स्पेनी परंपरा उसळते
गोया दि मिथ—बुल फायटिंग—टिल डेथ—

**अमृता प्रीतम**

एक व्यथा होती—
जी सिगारेटसारखी मी गुपचूप प्याले आहे
फक्त काही कविता आहेत—
ज्या सिगारेटमधून मी राखेसारख्या झटकल्या आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा

## एक दृष्टिकोण

सूर्याला सगळे खून माफ आहेत
रोज जगातल्या प्रत्येक माणसाचा एक दिवस तो खून करून टाकतो
आणि प्रत्येक वयाचा एक तुकडा रोज बळी होतो
माणसाच्या अधिकारात फक्त एव्हढेच आहे
की बळी पडलेला तुकडा त्याने घाबरून फेकून द्यावा आणि भ्यावे
किंवा निर्भयतेने त्याला कबाबासारखे भाजावे, खावे
आणि श्वासांची मदिरा पीत पुढच्या तुकड्याची प्रतीक्षा करावी....

## आत्ममिलन

माझी शय्या तयार आहे
पण जोडे आणि सदऱ्यासारखेच
तू आपले शरीरही उतरून ठेव
त्या तिकडे मोढ्यावर ठेवून दे
कांही विशेष गोष्ट नाही—
ही आपल्या आपल्या देशाची रीत आहे !

## दीड तासाची भेट

दीड तासाची भेट
जणू ढगाचा एक तुकडा
आज सूर्याबरोबर शिवला आहे
उसवून थकले आहे
पण काही जमेना, आणि वाटते
सूर्याच्या लाल सद्र्यात
हा ढग कोणी विणून टाकला आहे !

दीड तासाची भेट
समोरच्या त्या चौकात
एका पोलिसासारखी उभी
आणि माझ्या विचारांचे वाहणे
त्याने हात दाखवून थांबवले आहे
देव जाणे मी काय म्हटले होते
आणि देवाला माहीत तू काय ऐकलेस

दीड तासाची भेट
वाटते आदिवासी स्त्रीसारखी
आपण एक चिलीम पेटवावी
आणि दीड तासाची तंबाखू
या निखाऱ्यावर ठेवून ओढावी

माझे विचार भिऊन
चुकीचे वळण घेण्याअगोदर
ढगाला काढून घेताना
सूर्याने दुभंगून जाण्याअगोदर

भेटीचा आठव एका तिरस्कारात
बदलण्याअगोदर
दीड तासाचा धूर
काहीसा मी ओढीन, काहीसा वारा ओढील
याचा शब्द माझ्या वा तुझ्या जिभेवर
येण्याअगोदर
याचा उल्लेख माझ्या व तुझ्या कानावर
येण्याअगोदर

आणि पुरुष स्त्रीजातीच्या
अपमानाचे कारण बनण्या अगोदर
आणि स्त्री पुरुषजातीच्या
अप्रतिष्ठेस कारणीभूत होण्याअगोदर
अगोदर....अगोदर....

## आयुष्य

सहा पावले पुरी एक अर्धे, तुरुंगातली एक कोठडी
त्यात माणूस उठू बसू शकेल आणि आरामात झोपूही शकेल

'ईश्वर' एक शिळी भाकरी 'सबूरी' पतनाचे कालवण
हवे तर ते पोटभर त्याने दोन्ही वेळा खाऊन घ्यावे

आणि तुरुंगातल्या आवारात एक डबके 'ज्ञानाचे'
माणसाने तिथे हात-तोंड धुवावे—
आणि काही मच्छरे गाळून ते ओंजळभर प्यावे.

आत्म्याला एक जखम हा एक सर्वसामान्य रोग आहे

जखमेच्या नग्नतेची जर खूप लाज वाटली
तर स्वप्नांचा तुकडा फाडून तिला झाकून घ्यावी.

या तुरुंगाची ही गोष्ट—
कोणी कधी सांगितली नसती आणि कोणी कधी बोललीही नसती
की जगातली प्रत्येक क्रांती
एका ज्वरासारखी चढते, ज्वर चढतो आणि उतरूनही जातो—

परंतु जर कधी माणसाला आशेचा कॅन्सर झाला नसता....

# पदके

शूर लोक माझ्या देशाचे, शूर लोक तुझ्या देशाचे
हे सारे मरणे-मारणे जाणतात, शीर कापणे-कापवणे जाणतात
फक्त ही गोष्ट वेगळी—शीर कधी स्वतःचे नसते

माणसाचे शव असते परंतु ईश्वराचे शव नसते
आणि जेव्हा माणसाच्या आतला ईश्वराचा अंश मरतो
तेव्हा त्याचा कधी दुर्गंध येत नाही

प्रिय कोणी कुणाचे नाही अगदी दुसऱ्या प्रियकराचा धोका नाही
आणि धोकाही नाही कुठल्या दुःखाचा....

फक्त जी रेषा मोठी आहे ती याचा अपमान करते आहे
हो रेषा पुसावी, कारण रेषा सगळ्यांच्या मापाची नसते
म्हणून पूर्ण विजय निर्विघ्न आहे आणि पूर्ण उत्सवही निर्विघ्न आहे

काळ हसतो आहे—
आणि त्याच्या छातीवर लटकत आहेत नपुंसक पराक्रमाची काही पदके

## शहर

माझे शहर एका दीर्घ वादविवादासारखे
रस्ते—विनटोकाच्या चर्चेसारखे
आणि गल्ल्या अशा—
जसे एखाद्या गोष्टीला कोणी इकडे खेचावे कोणी तिकडे

प्रत्येक घर मुठीसारखे बंद
भिंती—दातओठ खाल्ल्यासारख्या
आणि गटारे, जसा तोंडातून फेस वहातो आहे

ही चर्चा जणू सूर्यापासून सुरू झाली
जी त्याला पाहून आणखी तापलेली
आणि प्रत्येक दाराच्या तोंडातून
मग सायकली आणि स्कूटर्सची चाके
शिव्यांसारखी निघतात
आणि घंट्या आणि हॉर्न एकमेकांवर धावून जातात

जे मूल या शहरात जन्माला येते
ते विचारते की कुठल्या विषयावर वादविवाद सुरू आहे
मग त्याचा प्रश्नही एक वाद बनतो
वादातून निघतो विवादात पोचतो

शंखांचे घंटांचे श्वास सुकतात
रात्र येते, डोके आपटते आणि निघून जाते
परंतु झोपेतही वाद संपत नाही
माझे शहर एका दीर्घ वादविवादासारखे....

## एक पत्र

मी—देवळीत पडलेले एक पुस्तक
कदाचित संतवचन असेन किंवा अभंगावली
किंवा कामसूत्राचे एक प्रकरण
अथवा काही आसने किंवा गुप्तरोगावरचे तोडगे
पण वाटते मी यांतले काहीच नाही
(काही असते तर नक्कीच कोणी वाचले असते.)

आणि वाटते की—क्रांतिकारकांची सभा झाली होती
आणि सभेत जो ठराव मांडला होता
त्याचीच मी एक हस्तलिखित प्रत आहे
आणि मग पोलिसांचा छापा
जो पास झाला कधी लागू झाला नाही
फक्त कारवाईसाठी सांभाळून ठेवला गेला.

आणि आता फक्त काही चिमण्या येतात
चोचीत काही काड्या आणतात
आणि माझ्या शरीरावर बसून
त्या दुसऱ्या पिढीची चिंता करतात
(दुसऱ्या पिढीची चिंता ही किती सुंदर चिंता आहे!)
पण कुठल्याही प्रयत्नांसाठी चिमण्यांना पंख असतात,
पण कुठल्या ठरावाला पंख नसतात.
(किंवा कुठल्या ठरावाला दुसरी पिढी नसते?)

फक्त कधी वाटते की हुंगून बघावे
की माझे भविष्य कुठे आहे ?
आणि या चिंतेने माझी काही पृष्ठे झिजतात
पण जेव्हा काही हुंगावेसे वाटते
तेव्हा फक्त विष्ठेचा वास येतो....
हे माझ्या धरतीच्या भविष्या
मी तुझी वर्तमान अवस्था !

## अक्षर

एक फत्तराचे नगर होते—
सूर्यवंशाचे फत्तर
चंद्रवंशाचे फत्तर
त्या नगरात रहात असत

असे म्हणतात—
जुलमी राजांचे राज्य होते
ना राजांना कान होते
ना प्रजेला आवाज होता

आणि तेव्हा—
ते लोक जेव्हा रडले
ते फत्तराचे झाले

फत्तराचा देव
फत्तराचा पुजारी
मीलन अंगाला स्पर्शत नव्हते
आणि विरह भंगत नव्हता

फत्तराच्या नगरात
सूर्याचा घोडा खिंकाळायचा
फत्तरावर पाय आपटायचा
मेघांचे हत्ती चित्कारायचे
फत्तरांना पायांनी उखडायचे
रात्रीचा अंधार फुत्कारायचा
आणि फत्तरावर कुंडली मारून बसायचा

आणि मग राजाचा हुकूम
कलम एकशे चव्वेचाळीस....
आणि फत्तर भिऊन बसायचे
जेव्हा मनाच्या कोपऱ्यात
तर हृदयाच्या हर्षासारखी
काहीशी पिवळी पुष्पपाकळी
किंवा हिरव्या गवताचे तृण
एका फत्तरातून उमटायचे
जणू थरकाप होऊन एका ऋषीचा
तपोभंग व्हावा

जीवन विझत होते आणि पेटत होते
आणि असा—फत्तराच्या नगरात
फत्तरांचा वंश वाढत होता.

एक होती शिला
एक होता फत्तर
त्यांचा त्या नगरात
संयोग होता लिहिलेला
त्यांनी दोघांनी मिळून
एक वर्ज्य असलेले फळ चाखले होते
मी आताही बसले की—
एक विचार येतो
की मीही असते जर हिरवे पान

त्यांच्या देहांचा निःश्वास—
एक हिरवा अंकुर
तर त्यांची कुशी माझ्या नशिबात असती.
सूर्याचा घोडा खिंकाळला असता

मेघांचे हत्ती चित्कारले असते
आणि रात्रीच्या सर्पांनी
राजांचे हुकूम फुत्कारले असते
पण त्यांच्या आड
मी सहज बसले असते
आणि कुठल्याशा--
ममतेच्या फटीत लपले असते....
पण कदाचित ते चकमकीचे फत्तर असावेत
जे मळल्या आभाळाखाली
मळल्या धरतीवर
एका फत्तरी शेजेवर झोपत,
आणि फत्तराच्या घासण्यातून
मी आगीसारखी जन्माला आले
आगीच्या ऋतूत

देहातून आग जन्मली
तेव्हा फत्तरही थरारला
आणि शिलाही थरारली
मग देहाची आग
त्यांनी पदरात टाकली
आणि धुराची गुटी
आगीला चाटवली
हसली रे हसली
एक वाऱ्याची दाई
रडली रे रडली
उदरी जन्म दिलेली आई :

"फत्तराच्या मांडीवर
आग खेळेना
फत्तरांची दुःखे
होती फत्तरासारखीच
फत्तरांच्या जिभेवर
फत्तरांचे फोड
आम्ही धरतीच्या हवाली
तू वाऱ्याच्या हवाली !"
मग सगळे शून्यवत जग
पुढे ते काही म्हणाले नाही
डोळे मिटण्याअगोदर
कदाचित हेही नाही पाहिले
की जन्मलेल्या आगीने
ज्वाळेसारखा श्वास घेतला

आगीच्या ओठांवर लिहिलेले
लांब लांब उसासे
आणि आगीच्या हाडांत होता
धूरच धूर

ही वाहती हवा
मला जिथे कुठें नेते
गरम गरम राख
माझ्या देहातून सांडते
आणि रोज माझ्या आयुष्याचा
जो दिवस चढतो
मी त्याला जवळ घेते
तो तिथल्या तिथेच राख होतो
मी विचार करते—

की धुराच्या रेषेसारखी
माथ्यावरची रेषा थरारते आहे?
आईच्या कुशीतून
चितेची आग जन्माला येते?

मी चितेच्या आगीत जळते
आणि चितेच्या आगीसारखी जळते
पण कधी—
निद्रेचा अंधार असा असतो
की स्वप्नांची निळी ज्वाळा निघते
आणि वाटते—
की चितेची आग
आगीचा अपमान आहे
आणि कोणा सोहनी वा सस्सी
किंवा हीरमध्ये जी आग होती
मला तिची ओळख आहे....
आणि एक विचार येतो
की फक्त स्मशानातली आग
आग नसते
हा आगीचा अपमान आहे
आणि वाटते—
फत्तराच्या नगरात
वारिसने जी आग पेटवली होती
ही माझी आगदेखील
तिचीच वारसदार आहे
आग आगीची वारस

टीप : सोहनी, सस्सी, हीर : पंजाबी लोककथेचे नायक
बारिस सहा : हीर-रांजाचा लेखक

पण फत्तराच्या नगरीत
कोणी आगीला पाळीत नाही
छातीच्या चुलीत कोणी
आग पेटवीत नाही
आणि माझ्या जिभेवर उमटले
त्या आगीचे फोड

ते फत्तराचे नागरिक
सांगतात आणि सांगतात
या आगीला विझवा
टाका टाका
कुठल्या पेवात लपवून टाका
द्या द्या
गळ्याला नख द्या
जा जा
हिला नदीत वाहवून या

एक फत्तरांचे नगर होते
फत्तरांच्या किनाऱ्यांना
आणि पोरक्या आगीची धग
कोणी वाटून घेईना....

पुन्हा तीच हवा—
जिने मांडीवर खेळवले
आणि जिने माझ्या आईच्या
आईच्या आईला प्रसवले
कुठूनशी पळत पळत आली
आणि हातात काही अक्षरे आणली

"ही छोटीशी काळी
रेषा नकोस समजू
हा रेषांचा गुच्छ
तुझ्या आगीच्या सोबतीला
बघ! अक्षरांची असते
आगीची हिंमत
आगीची हिंमत
आगीहून मोठी"

आणि असे म्हणून
ती निघून गेली पुढे—
"तुझ्या आगीचे आयुष्य—
या अक्षरांना लाभो!"

## नागपंचमी

माझा देह जुने झाड आहे....
अन् तुझे प्रेम नागवंशी—
युगानुयुगे माझ्या झाडाच्या
एका खोपीत रहाते आहे.

नागांची वस्तीच झाडांचे सत्त्व आहे
नाहीतर या फांद्या अन् वेली पानं—
देहाचा विस्तार असतो....

तसा तर विस्तारही प्रिय
पिवळे दिवस झडतात तर
हिरवे दिवसही उगवतात
आणि मनातला काळोख जो फार गर्द आहे
—तिथेही कित्येक वेळा फुले उमलतात.
आणि झाडाच्या एका फांदीवर
जी मुलांची झोका झाली
ती ही देहाची आरास

बघ या मातीची बरकत
मी झाडांच्या मुळांपेक्षा सवाईने फैलावले आहे
पण देहाच्या विस्तारातून
मी घडीभर सवड काढली आहे
आणि दुधाची वाटी चोरून
तुझा देह पुजायला आले आहे....

हे तुझ्या माझ्या देहाचे पुष्प आहे
आणि झाडाला पडलेल्या बिळाशपथ
कित्येक वर्षांनंतर
माझ्या आयुष्यात आला आहे
हा नागपंचमीचा दिवस....

## मित्रा

मित्रा ! तू जे पत्र लिहिले होतेस
परंतु जे जगामार्फत मिळाले
आणि दोस्ता ! प्रेमपत्र
जे धरतीच्या मापाचे असते
जे आकाशाच्या मापाचे असते
दुनियावाल्यांनी ते फाडून
एका जातीइतके कापून
जातीच्या मापाचे करून टाकले....

आणि मग शहरात चर्चा सुरू झाली
ते तुझे पत्र जे माझ्या नावावर होते
लोक म्हणतात धर्माच्या अंगावर
ते फार सैल वाटते
म्हणून पत्राचे लिखाण त्यांनी
कित्येक जागी फाडून घेतले होते....

आणि पुढे तू जाणतोस की ती कसली डोकी
ज्यांच्या जाणिवेच्या मापात
प्रत्येक अक्षर मोकळे येत होते
म्हणूनच त्यांनी आपली डोकी
अक्षरांवर आपटून
प्रत्येक अक्षर उखडून टाकले होते

आणि जे पत्र मला मिळाले नाही
पण ज्यांच्या मार्फत आले
ते जग दुःखी आहे—की मी
त्या पत्राच्या उत्तरासारखी आहे....

## मोकळी जागा

फक्त दोन राजवाडे होते—
एकाने मला आणि त्याला बेघर केले होते
आणि दुसऱ्याचा आम्ही दोघांनी त्याग केला होता.

नग्न आकाशाखाली—
मी कितीतरी वेळ
तनाच्या झिमझिमीत भिजत राहिले
तो कितीतरी वेळ
तनाच्या रिमझिमीत विरघळत राहिला.

मग वयाच्या मोहाला
एका विषासारखे पिऊन
त्याने कापत्या हाताने माझा हात पकडला.
चल ! क्षणांच्या डोक्यावर एक छत टाकू
ती बघ ! पलिकडे—समोर, तिकडे
खरे आणि खोटे यामध्ये—थोडी जागा मोकळी आहे....

## आगीची कथा

ही आगीची कथा आहे, तूच ही गोष्ट सांगितली होतीस
ही आयुष्याची तीच सिगारेट आहे जी तूच कधी पेटवली होतीस

ठिणगी तू दिली होतीस हे हृदय सतत जळत राहिले
काळ लेखणी पकडून काही हिशोब लिहीत राहिला

चौदा मिनिटे झाली आहेत याचे वहीखाते बघ
चौदा वर्षे झाली आहेत या लेखणीने सांगितले

माझ्या या देहात तुझा श्वास चालू राहिला
धरती साक्ष देईल धूर निघत राहिला

वयाची सिगारेट जळून गेली माझ्या प्रीतीचा दरवळ
काही तुझ्या श्वासात काही हवेत मिसळला

बघ हा शेवटचा तुकडा बोटांमधून टाकून दे
माझ्या प्रीतीचा चटका तुझ्या बोटांना न बसो

आयुष्याचे आता दुःख नाही, या आगीला सांभाळ
तुझ्या हाताची खुशाली मागते, आता आणखी सिगारेट पेटवून दे

## माता तृप्ताची नऊ स्वप्ने

तृप्ता दचकून उठली, रजईला सावरले
लाल लज्जेचा पदर खांद्यावरून पुढे ओढला

आपल्या नवऱ्याकडे पाहिले
मग शुभ्र बिछान्यावरच्या चुण्यांसारखी थबकली

आणि सांगू लागली :
आज माघातल्या रात्री मी नदीत पाऊल टाकले

एवढ्या गारठ्याच्या रात्री नदी कोमट होती

गोष्ट अघटित
पाण्याला अंग लागले तो नदी दुधाची झाली

कशी नदी करामती मी दुधात न्हाले

या तलवंडीत ही कसली नदी ? कसले स्वप्न

आणि नदीत चंद्र तरंगत होता
मी चंद्राला तळहातावर ठेवले घोट घेतला

आणि नदीचे पाणी—माझ्या रक्तात भिनत राहिले
आणि तो प्रकाश माझ्या गर्भात हलत राहिला.

फाल्गुनाच्या कटोरीत सात रंग घोळू मुखी ना मी बोळू

या मातीच्या देहाचे सार्थक होईल
जेव्हा गर्भात घरटे बांधले जाईल

हा कसला जप ? कसले तप

की मातेला गर्भात ईश्वरी साक्षात्कार होतो....

डोहाळ्यांच्या ओकाऱ्या जणू शिसारी आली

मंथन करायला बसले तर वाटले लोणी हलले
माठात हात घातला तर सूर्याचा पेढा निघाला

हा कुठला भोग होता ? हा कुठला संयोग होता ?
आणि चढत्या चैत्रात हे कसले स्वप्न ?

मी आणि माझ्या गर्भापर्यंत हे स्वप्नाचे अंतर

माझा जीव उल्हासला अन् काळीज भ्याले

वैशाखात येणारे हे सोनपीक
सुपात पाखडायला घेतले तर सूप नक्षत्रांनी भरून गेले....

आज मंद रात्रीच्या वेळी
आणि ज्येष्ठाच्या महिन्यात हा कसला आवाज होता ?

जणू जळातून स्थळातून एक नाद घुमला
हे मोहाचे आणि मायेचे गीत होते ?
की ईश्वराच्या कायेचे गीत होते ?

हा कुठला दैवी सुगंध होता ? की माझ्या नाभीचा गंध होता ?

मी दचकत दचकत गेले, भीत गेले,
आणि याच आवाजाच्या रोखाने वनात चालत राहिले....

हा कसला आवाज ? कसले स्वप्न ?
कितीसे परके ? कितीसे आपले ?

मी एक हरिणी बावरीसी झाले
आणि आपल्या गर्भाला आपले कान लावत राहिले

आषाढाचा महिना—तृप्ताचे डोळे उघडले सहज
जसे फूल उमलावे तसा दिवस चढतो आहे

"हे माझे आयुष्य कुठल्या सरोवराचे पाणी ?
मी आत्ता इथे एक हंस पोहताना पाहिला

हे कसले स्वप्न ? की जागेपणीही वाटते
माझ्या गर्भात त्याचा पंख हलतो आहे...."

कुठले झाड ना माणूस जवळ
मग कोणी माझ्या झोळीत नारळ टाकला ?

मी नारळ फोडला तो लोक खोबरे घ्यायला आले
ओल्या नारळाचे पाणी मी कटोऱ्यात टाकले

काही ठेव नाही साठव नाही, सख्खे नाही परके नाही
दारात खूप लोक आले
पण ओल्या नारळाचे खोबरे—तरीदेखील संपले नाही.

हे कसले खोबरे ? हे कसले स्वप्न ?
अन् स्वप्नाचे धागे कितीतरी लांब ?

हा छातीचा श्रावण, मी छातीला हात लावला
तेव्हा नारळाचे पाणी—दुधासारखे टपकले.

हा कसला भादवा ? ही कसली जादू ?

सगळ्याच गोष्टी वेगळ्या
या गर्भातल्या बाळाचा अंगरखा कोण शिवणार ?

ही कसली टोपली, हे कसले गुंडे
मी काल जणू रात्रभर किरणे गुंडाळली....

अश्विनाच्या महिन्यात तृप्ता जागी झाली विरक्तशी

"अरे माझ्या आयुष्या !
तू कोणासाठी काततोस मोहाचा पेळू ?

मोहाच्या सुतात आकाश लपेटता येईना, सूर्याला बांधता येईना
ही सत्यासारखी वस्तू याचा अंगरखा कातता आला नसता

आणि तृप्ताने गर्भासमोर मस्तक नमवले—
मी स्वप्नाचे मर्म जाणले, हे ना आपले ना परके

कोणी दैवी साधू—लहरीत आला
क्षणभर असाच बसला ऐकत गर्भाची धुनी

अरे माझ्या आयुष्या !
तू कोणासाठी काततोस मोहाचा पेळू....

माझ्या कार्तिक धर्मी, माझे आयुष्य सुकर्मी
माझ्या गर्भाची धुनी कातते आगीचा पेळू

दीप देहाचा उजळला स्पर्श प्रकाशकाडीने केला....
बोलवा धरतीच्या दाईला माझ्या पहिल्यावहिल्या वेणा....

**टीप :** तृप्ता—गुरु नानकाच्या आईचे नाव



मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२४६९५

REFBK-0024678
REFBK-0024678



अमृता प्रीतम

एक हैरानी हुई और एक गहरी तसल्ली जब देखा कि सुशील पगारिया मेरी कविताओंको पंजाबीसे मराठी जबानमें ऐसे उडेंल रही है जैसे दो भाषाएं दो काँचके बर्तन हैं। और, काव्यकल्पना चिंतनके फलोंका ऐसा रस है, जो सहजतासे एक बर्तनमेंसे दुसरेमें डाला जा सकता है।

सुशील पगारिया खुद एक बडी अहसासमंद और गहरी संवेदनशीलताकी शायरा है। इसलिये मराठी भाषा तो उनके लिये एक पारदर्शी शीशा थी। पर पंजाबी भाषा भी उनको एक ऐसी पारदर्शी हो जायेगी यह मेरे लिये एक सुखद हैरानी की बात थी। जब वह मेरे सामने बैठकर कागज और कॅनव्हासकी हर कविता की हर पंक्तिका इतनी सहजतासे अनुवाद करती रही, तो मुझे लगा मेरे लिये भी मराठी भाषा इतनी अपनीसी हो गई है कि उसमें अपने चिंतनकी परछाइयाँ आसानीसे देख सकती हूँ।